

# प्रचिती
## शिष्यांच्या अनुभूती


**प्रकाशक**
श्रीसद्गुरू फौंडेशन
मु.पो. श्रीक्षेत्र नृसिंहवाडी
तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर



© सौ. शैलजा गुरुनाथ मुंगळे



**प्रकाशन स्थळ**
९९९, 'शरणागती', संगम रस्ता
मु.पो. श्रीक्षेत्र नृसिंहवाडी
तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर

**प्रकाशन दिनांक**
रविवार, २६।१२।०४
मार्गशीर्ष शु. १५
श्री दत्तात्रेय जयंती,
(पौर्णिमा)


**मुखपृष्ठ**
श्री. हेमंत देशपांडे
पुणे

**मांडणी व सजावट**
सदाशिव जंगम

**अक्षरजुळणी**
ग्रे मॅटर
४८७, ब नारायण पेठ,
सुवर्णा चेंबर्स, पुणे ३०.

**मुद्रक**
योगेश जंगम
जंगम ऑफसेट प्रा. लि.
२५/१० नांदेड फाटा, सिंहगड रोड,
पुणे ४११ ०४१. फोन : २४३९२७५९

**मूल्य ४००/- रुपये**
(खाजगी वितरणासाठी)



# अर्पणपत्रिका

शुद्ध भक्ती आणि साधन । सदैव वाढवी आत्मधन ।
साधकाचे तन मन । सद्‌गुरूरूप होतसे ।

या पुस्तकातील प्रचिती, समृद्ध भावविश्व साकार करते. ही प्रचिती साधनमार्गामध्ये अनेक साधकांना आनंददायक होईल यात संशय नाही. साधनेच्या बाबतीत तडजोड केली नाही तर आत्मशक्तीची जोड आयुष्याचे अधिष्ठान होते. यात ज्यांचे लेख आहेत त्यांना प्रचितीतून प्राप्त झालेला आनंद सर्व वाचकांच्या वाट्यास येवो, अशी सद्‌गुरूचंना प्रार्थना. हा ग्रंथ सर्व प्रचितीपूर्ण साधकांना व त्यांचे परम ध्येय असलेल्या सद्‌गुरूंच्या मनोहर व निर्गुण चरणी, त्यांच्या अक्षय कृपेसाठी समर्पित

साधकवृंद

## अर्घ्य अक्षरांचे

सद्‌गुरू धाग्याने बांधले गेलेले व एकमेकांचे जवळचे आप्त बनून गेलेले सर्व साधक एकमेकांना भेटले की, त्यांच्या आनंदाला उधाण येते, शब्दांना बहर येतो. गुरुकृपेच्या खुणा किती प्रगट करू, किती अनुभव सांगू, असे त्यांना होऊन जाते. आतली प्रचिती प्रगट होते ती पुन्हा अनुभवून आत घट्ट रुतून बसण्यासाठीच! सांगणारा, ऐकणारा पुन्हा पुन्हा ते क्षण आठवत राहतो. आत साठवत राहतो. तो आनंद काही वेगळाच! आम्ही सर्वांनी हा आनंद मनमुराद लुटला. एकमेकांना भेटलो की, सद्‌गुरू प्रत्येकाच्या शब्दातून प्रगट व्हायचे. किती अनुभव, किती खुणा प्रत्येकाचे एक स्वतंत्र पुस्तक होईल. इतके अनुभव गाठीला. मग वाटलं, हे सगळे जर पुस्तकरूपाने एकत्रित साठवून ठेवले तर किती छान होईल. सगळ्यांनाच तो आनंद अनुभवता येईल म्हणून हा पुस्तक प्रपंच! आम्ही २-३ वर्षे मागे लागलो होतो. पण सद्‌गुरू दाद देईनात. चमत्काराच्या रूपात परमार्थ अनुभवू नका, ही त्यांची ठाम शिकवण. आणि साधनेत तडजोड नको हा त्यांचा बाणा. पण शेवटी आमची हौस पुरविण्यास ते तयार झाले व 'प्रचिती'ने आकार घेतला. अनेक साधकांनी अनुभव पाठविले. वाचताना मन थक्क होते. विविध प्रकारचे अनुभव, प्रचिती जेव्हा वेगवेगळ्या शब्दांतून प्रगट होते, तेव्हा फुलणारं शब्दवैभव सर्वांनाच सुखावून जातं, भाव तोच, पण प्रगटीकरणाचा आविष्कार निरनिराळा! अंतरंग उलगडून दाखवणारे हे अनुभव. वाचताना आपल्याच आत ते अनुभवायला मिळतात. सद्‌गुरूंचा साधक परिवार फार मोठा आहे, त्यात सर्वांना स्थान आहे, लहान मुले, तरूण, प्रौढ, वयस्क, श्रीमंत गरीब, सगळेच सद्‌गुरूंना सारखे. सगळेच सद्‌गुरूंना जवळचे !

'प्रचिती'च्या निमित्ताने खूप अनुभवायला मिळाले. मानवी मन जणू उलगडलं गेलं. किती लिहू अन् किती नकोचा सुंदर शब्दाविष्कारही सामोरा आला. सद्‌गुरूंकडून काय घ्यावं आणि कसं घ्यावं हेही समजणं खूप महत्त्वाचे असते याचीही जाणीव झाली.

जाणिवा आणि प्रत्यय नसेल तर गुळगुळीत शब्द वापरायचे आणि त्यावरून झरकन घसरून जायचे अनुभव घ्यावेच लागतात. उत्सव, प्रसाद, पूजा, कार्यक्रम यांत 'कार्यकर्ता' म्हणूनच आयुष्य कधी वाया जाते हे समजतच नाही. आणि आपण नेमके काय केले, काय करत आहोत हे न समजल्याने गोंधळलेले चेहरे, फसविणारे मन यांत अडकलेले आणि सहजसुंदर प्रचितीचा प्रत्यय न आल्याने मुखवटा पांघरण्याशिवाय पर्याय नसणारे लोकांचे थवेच्या थवे 'कोण्या एका' पाठोपाठ धावतच राहतात. काहीच हाती न आल्याने वैफल्याच्या प्रत्ययाने 'हेही नाही आणि तेही नाही' या अवस्थेत कुठेतरी अडकतात, हे दृश्य नेहमीचेच!

पण सद्‌गुरूंची झळझळीत प्रचिती समोर प्रगट झाल्यावर परमार्थ म्हणजे नेमके काय हे आपोआपच जाणवते. सरांना आवडतो तो नेटकेपणा, कष्टाने मिळविलेला पैसा, नेमाची साधना, स्वच्छ अंतरंग, विवेकाची बैठक, त्यातून सहजपणे फुललेले वैराग्य, प्रपंच व परमार्थाचा समतोल, विचारातील स्पष्टता, यातून ते प्रत्येकाच्या अंतरंगात बदल घडवत राहतात, चमत्काराची अपेक्षा मोडून काढतात, कृपा म्हणजे केवळ लौकिकातील यश हे समीकरणच कसे चुकीचे आहे याची स्पष्ट जाणीव देतात. केवळ दर्शने होऊन परमार्थ साधत नाही. नाद ऐकू आला, बिंदू दिसू लागले तरी पुढे काय? हा अट्टाहास सुटता कामा नये हे ते ठामपणे बजावतात. अगदी प्रत्यक्ष दत्तमहाराज समोर आले तरी तुला त्याचा काय उपयोग? जोपर्यंत तुझ्या आत 'अहं ब्रह्मास्मि'ची प्रचिती येत

नाही, 'चिदानंद रुपम् शिवो हं शिवो हं' या जाणिवेशी तू एकरूप होत नाहीस तोपर्यंत पूर्णत्व नाही हे त्रिकालाबाधित सत्य आहे हे ते मनावर ठसवितात. या प्रवासात धोके नेमके कुठे आहेत, तुम्ही कुठे फसता, कुठे थांबता, तुमच्या प्रचितीतला नेमका आभास कोणता, याचे संपूर्ण विश्लेषण त्यांच्याकडे असते. आणि सत्याला तुम्ही आभास समजून प्रतिबंध केला तर तो अडथळाही ते सहजपणे काढून टाकतात. उत्सवात रंगून जाणे हे ठीक आहे, पण केवळ उत्सव म्हणजे परमार्थ नाही. प्रसाद खाऊन तो प्राप्त होत नाही, इतरांच्या प्रचिती, गप्पा, चर्चा, प्रवचने, कीर्तने यातून तो साध्य होत नाही तर माझे काय? हा प्रश्न घेऊन सतत त्याचा मागोवा घेतला, साधनेचा अट्टाहास केला, ध्यानाला पर्याय शोधला नाही, दर्शनातच रमला नाहीत तरच तो सापडतो. आणि नुसता सापडत नाही तर रुजून बसतो याचा प्रत्यय ते सहज देतात. प्रचितीशिवाय परमार्थ करूच नकोस, मी सांगतो तसे केलेस तर प्रचिती येणारच, हा त्यांचा आत्मविश्वास करणाऱ्याला त्या 'प्रचिती'ची अनुभूती घ्यायला उत्सुकच बनविल्याशिवाय राहात नाही.

प्रत्येक प्रश्नाला त्यांच्याकडे उत्तर आहे. सगळे विषय ते सहजपणे मुळापासून जाणू शकतात. त्यातले मर्म त्या विषयाच्या अधिकारी व्यक्तीसमोर प्रगट करतात. यावर आश्चर्यचकित झालेल्या त्या व्यक्तीला ते कधीच तिथेच सोडत नाहीत. 'मला हे काही समजत नाही, पण या विषयांचा जो निर्माता आहे तो माझ्याजवळ आहे. तो मला समजावून देतो' हे त्यांचे यावरचे भाष्य ऐकणाऱ्याला त्यांच्यापुढे नतमस्तक व्हायलाच लावते.

निखळ, निर्मळ, स्पष्ट, प्रेमळ, आश्वासक, परम सत्यांची पूर्ण जाणीव असलेले असे हे सद्गुरू प्रत्येकाला आपलेच वाटले नाहीत तरच नवल! त्यांच्याकडे येणाऱ्यांचे फुललेले चेहरेच याचा प्रत्यय देतात. त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला ते मुक्त श्वास घ्यायला शिकवितात. भरभरून जगायला शिकवितात. आतल्या गाठी उलगडून कोणत्याही मुखवट्याशिवाय वावरायला शिकवितात. खरं काय याची जाणीव देतात. नेमकं काय करायला हवं हे सांगतात. कुठे चुकलं ते दाखवितात. मी तुझ्याबरोबर असतोच हे शब्दानेच केवळ सांगत नाहीत तर त्याच्या खुणा पटवून देतात. आळशीपणा दडविणाऱ्या सबबी सांगितल्या की रागावतात आणि गुणांचे असे काही कौतुक करतात की, आपल्यात हे गुण आहेत हे नक्की न समजलेले आपण त्या गुणांना आत पक्के रुजवून त्यानुसार कधी वागायला लागतो हे कळतच नाही. मी त्यांचा आहे, माझ्यावर त्यांचे प्रेम आहे, ते पाठीशी आहेत या आश्वासकतेने आपोआपच एक विश्वास मनात रुजतो आणि मग प्रत्येकजण त्यांचाच होऊन राहतो. ते तेज, ती प्रसन्नता, ती स्वच्छ मोकळेपणाची जाणीव घेतच त्यांचा प्रत्येक शिष्य बाहेर वावरतो, ते त्या गुरुपदाची अभिलाषा इतरांच्यातही निर्माण करण्यासाठीच!

जसे ते गुणांचे कौतुक करतात तसेच दोषांचे प्रकटीकरणही करतात. आपल्या उणिवा लपविण्यात, त्यावर पांघरूण घालण्यात आपले सारे आयुष्य जाते पण इथे आलात की या उणिवा, दोष अगदी स्पष्टपणे बाहेर काढले जातात. पण यामागचा सद्गुरूंचा हेतू तुम्हांला कमी लेखण्याचा किंवा तुमचा अपमान करण्याचा नसतो, तर हे दोष कमी होत होत निघून जावेत, तुम्ही स्वत:ला नीट ओळखावे, कसल्याही गैरसमजात तुम्ही राहू नये हा त्यांचा मुख्य उद्देश आणि मी पाहिलंय त्यांच्या या बोलण्याने अनेक वाल्यांचे वाल्मीकी झालेत. स्पष्टवक्तेपणा हा त्यांचा विशेष, शब्दांचे अवडंबर नाही, 'मी'चा अहंकार नाही, खोटी आश्वासने नाहीत. समोरचा कितीही मोठा असला तरी त्याचे दडपण नाही, कोणाकडून काही घेणे नाही, कारण त्यांना

फक्त देणेच माहीत आहे, येणाऱ्याला भरभरून द्यायचं हेच त्यांचे व्रत!

अशा या सद्‌गुरूंना २ ऑगस्ट १९९९ रोजी एका प्रचंड आघाताला तोंड द्यावे लागले. 'तू जाऊ नकोस' असा अट्टाहास सद्‌गुरूंनी केला असूनही, एरवी सदैव बाबांचे वाक्य प्रमाण मानणारी गायत्री आपल्या तिन्ही पिल्लांना घेऊन पुण्याला गेली. परत येताना गाडीला अपघात झाला आणि क्षणात सगळे चक्र फिरले. चिमण्या अथर्वला आपल्याबरोबर घेऊन, गायत्री आपल्या इष्टधामाला गेली. सोबतीला नचिकेत होताच. लौकिकात अनाकलनीय असलेली ही घटना दोन्ही कुटुंबांना उध्वस्त करून गेली. गायत्री, एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व! टपोरे, तेजस्वी डोळे, संपूर्ण चेहऱ्याला टवटवी देणारा अंगभूत गोडवा, चैतन्याने ओतप्रोत भरलेल्या हालचाली. ती बोलायला लागली की समोरची व्यक्ती त्या शब्दांत चिंब भिजून जायची. तिचे अस्तित्व आपल्या चैतन्याने तो परिसर भारून टाकायचे, तिच्या हालचालीने सगळीकडे उत्साह निर्माण व्हायचा, सर्वांवर मनापासून प्रेम करणारी, भरभरून आयुष्य जगणारी, आपले 'बाबा' सर्वस्व मानणारी गायत्री क्षणात सगळ्यांना पोरकं करून निघून गेली. आई, बाबा, आजी, लाडकी बहीण गौरी, अपूर्वा, वैष्णवी या दोन चिमण्या, साथीदार अजय सगळे सगळे जिव्हाळ्याचे बंध तटातट तुटून गेले. माणसांची रीघ घराकडे लागली. या प्रसंगातही आपले दुःख महाराजांच्या पायावर ठेवून सद्‌गुरू आलेल्या प्रत्येकाची समजूत घालू लागले, तर सौ. वहिनींनी अपूर्वा, वैष्णवीला पोटाशी धरले. हे दोघेही अजयरावांचे आई-बाप बनले. नचिकेतच्या आई बाबांच्या दु:खाला शांतवू लागले. त्यांचे शब्द इतरांच्या दु:खावर फुंकर घालू लागले पण त्यांच्या स्वत:च्या दु:खाचे सांत्वन करण्याची ताकद इतर कोणाच्याही शब्दात नव्हती. 'का सोडून गेलीस गाया। का पातळ केलीस माया।' अशा व्याकुळतेतून प्रगट होणारे त्यांचे शब्द डोळ्यातल्या पाण्याचा बांध फोडून टाकत होते. सद्‌गुरूनाथ महाराज 'साक्षी' होते. दिवस उलटत गेले. गायत्री मात्र प्रत्येक क्षणाक्षणाला त्यांच्या आत खोल उतरत राहिली. जिव्हारीचा घाव बनून! गायत्री, अथर्व ज्ञानपीठाचे अधिष्ठान बनली. नचिकेतने गाणगापूरमध्ये आपले स्थान निर्माण केले. दरम्यानच्या काळात ती. भाऊही स्वधामाला गेले. कुमार कुठे गेला? अजून का आला नाही? अशी काळजी करणारे भाऊ निघून गेले. सोबतीला होती आयुष्यभर केलेली श्रीगुरुचरित्राची पारायणे! त्यांची पूजा बघण्यासारखी असे. स्वत: उगाळलेला मोठ्ठा गंधाचा गोळा, निवडून आणलेली सुगंधी फुले अशा थाटामाटात २,२ वाजेपर्यंत पूजा चालत असे. भाऊ गेले आठवणी मागे ठेवून. नचिकेतचे वडील श्री. वाघ यांनीही नचिकेतच्या भेटीसाठी गडबड केली. सद्‌गुरूंवर अत्यंत प्रेम करणारे, त्यांच्यावर निष्ठा असणारे वाघ हार्टअॅटॅकचे कारण बनवून चैतन्यवासी झाले. पती व पुत्र यांच्या अशा सोडून जाण्याने एकाकी झालेल्या रेखाताई सद्‌गुरूंच्या आधाराने आपला तोल सावरू लागल्या. सद्‌गुरूंचे जिवलग परममित्र श्री. मोकाशी हेही पाठोपाठ आपल्या परमधामाकडे गेले. आपल्या गुरुप्रेमाला शब्दरूप देणारे, थोडा जरी गुरुसहवास अंतरला तरी, व्याकूळ होऊन, 'का हो देवा ऐसे घडले। सहवासासी अंतर पडले।' असे आर्तपणे प्रगट करणारे सर्वांचे लाडके मोकाशी सर, सगुणाचा सहवास सोडून त्या निराकाराशी एकरूप झाले, त्यांच्या गीताशिवाय गुरुपौर्णिमा सुनी होऊन राहिली. त्यांच्याआधीच त्यांचे जावई श्री. उदय हेही गेले. खरे तर सासरे-जावई या नात्यापेक्षा बाप-लेक हे नाते त्यांना शोभत होते. प्रत्येक प्रसंगात ही कुटुंबं सावरली जात होती सद्‌गुरूंच्या आधाराने, त्यांच्या आश्वासक शब्दाने आपल्या जखमा भरून काढत होती. त्यांचे बोट धरून उभी राहत होती.

सद्‌गुरूंचा हा परिवार आहे. यातल्या प्रत्येकाच्या यशाने ते आनंदित होतात, प्रत्येकाच्या अपयशात ते आधारवड